# मेट्रो ३ प्रकल्पाचे ८२ टक्के काम पूर्ण; कारशेडचे ६५ टक्के काम पूर्ण

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे - सीप्झ मेट्रो - ३ प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे एकूण ८२ टक्के पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील अति महत्त्वाच्या भूमिगत बोगद्यांचे काम पूर्ण झाले आहे. तर प्रकल्पासाठी महत्त्वाचे असलेल्या आरेमधील कारशेडचे सुमारे ६५ टक्के काम पूर्ण झाले असून बांधकाम, स्थानकांचे काम, मेट्रो रुळांची कामे प्रगतिपथावर आहेत. राज्य सरकारने मेट्रो ३ च्या आराखड्याला २०११ मध्ये मंजुरी दिली. त्यानंतर २०१३ मध्ये २३ हजार १३६ कोटी रुपयांच्या प्रकल्प खर्चाला मंजुरी देण्यात आली. प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी प्राप्त झाल्यानंतर २०१६ मध्ये प्रकल्पाचे काम सुरू झाले. या मेट्रो ३ मार्गाची एकूण लांबी ३३.५ किमी असून हा मार्ग संपूर्ण भुयारी आहे.